# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 11 June 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – ११ जून २०२४ सायंकाळी ६.१०

****

- केंद्रीय मंत्रिमंडळातल्या बहुतांश मंत्र्यांकडून पदभार ग्रहण-अधिकारी कर्मचाऱ्यांकडून अनौपचारिक स्वागत
- उच्च शिक्षण संस्थांना वर्षातून दोन वेळा प्रवेश प्रक्रिया राबवण्यासाठी यूजीसीची परवानगी
- बनावट कागदपत्रांच्या आधारे मुंबईत मतदान करणाऱ्या चार बांगला देशी नागरिकांना अटक

आणि

- मराठवाड्याच्या अनेक महसुली मंडळात अतिवृष्टी-लातूर जिल्ह्यात रेणा नदीकाठालगत धोक्याचा इशारा

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाचं खातेवाटप काल जाहीर झाल्यानंतर आज त्यापैकी बहुतेक मंत्र्यांनी आपापल्या कार्यालयात पदभार स्वीकारला. यात, अमित शाह यांनी गृह आणि सहकार मंत्रालयाचा, डॉक्टर एस. जयशंकर यांनी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचा, जे.पी. नड्डा यांनी आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाचा, अश्विनी वैष्णव यांनी माहिती आणि प्रसारण तसंच रेल्वे मंत्रालयाचा आणि डॉक्टर एल. मुरुगन यांनी माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री पदाचा कार्यभार स्वीकारला.

रामदास आठवले यांनी सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री पदाचा, रक्षा खडसे यांनी केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा खात्याच्या राज्यमंत्री पदाचा, मुरलीधर मोहोळ यांनी सहकार राज्यमंत्री पदाचा, तर प्रतापराव जाधव यांनी स्वतंत्र

प्रभार असलेल्या आयुष मंत्रालयाचे राज्यमंत्री म्हणून कार्यभार स्वीकारला. सर्व मंत्रालयातल्या अधिकारी तसंच कर्मचारी वर्गाकडून आपापल्या कार्यालयात मंत्र्यांचं अनौपचारिक स्वागत करण्यात आलं.

नितीन गडकरी यांनी रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाचा पदभार स्वीकारला, आणि अजय टम्टा आणि हर्ष मल्होत्रा या आपल्या खात्याच्या राज्यमंत्र्यांसह विभागाच्या मुख्य अधिकाऱ्यांची बैठक घेऊन विविध विषयांवर चर्चा केली.

****

विद्यापीठ अनुदान आयोग– यूजीसीने, उच्च शिक्षण संस्थांना वर्षातून दोन वेळा प्रवेश प्रक्रिया राबवण्याची परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे. पुढच्या शैक्षणिक वर्षापासून हा निर्णय अमलात येणार आहे. सध्या एका वर्षात एकाच शैक्षणिक सत्रात प्रवेश घेता येतो. या नव्या निर्णयामुळे, परीक्षांचा निकाल उशिरा लागलेल्या तसंच वैयक्तिक कारणांमुळे पहिल्या सत्रात प्रवेश न घेऊ शकणाऱ्या विद्यार्थ्यांना लाभ होणार आहे.

****

वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात आलेली नीट ही परीक्षा प्रक्रिया रद्द करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली आहे. न्यायालयाच्या सुटीकालीन पीठानं त्यावर राष्ट्रीय चाचणी संस्थेला नोटीस बजावली असून पुढची सुनावणी येत्या ८ जुलैला ठेवली आहे. मात्र परीक्षेनंतरच्या समुपदेशन प्रक्रियेला स्थगिती द्यायला न्यायालयानं नकार दिला. अशाच आशयाच्या याचिका कोलकाता आणि दिल्ली उच्च न्यायालयातही दाखल झाल्या आहेत.

****

बनावट कागदपत्रांच्या आधारे मुंबईत लोकसभा निवडणुकीसाठी मतदान करणाऱ्या चार बांगला देशी नागरिकांना दहशतवाद विरोधी पथक –एटीएसनं अटक केली आहे. या चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांना बनावट कागदपत्रं मिळवून देणाऱ्या व्यक्तीचा शोध सुरू आहे.

****

महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी छाननीनंतर एकंदर ८८ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक तसंच मुंबई शिक्षक

मतदारसंघ अशा ४ जागांकरता येत्या २६ जून रोजी मतदान होणार आहे. उद्यापर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत, तर, येत्या १ जुलैला मतमोजणी होणार आहे. दरम्यान, या निवडणुकीत मतदानाची वेळ वाढवण्याबाबतची काही संघटनांची मागणी मान्य करत, निवडणूक आयोगानं ही वेळ आता सकाळी सात ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत ठेवली आहे.

****

केंद्रीय कृषी मूल्य आयोगाची आज मुंबईत सह्याद्री अतिथीगृहात बैठक झाली. या बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबोधित केलं. कांदा निर्यात, सोयाबीन तसंच कपाशीच्या किमान हमी भावाकडे लक्ष देण्याची गरज मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. तेलाची आयात कमी करून देशांतर्गत तेलाचं उत्पादन वाढवण्याची आवश्यकताही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

****

राज्यातल्या धरणं आणि तलावांमधला अल्प जलसाठा आणि काही भागात आजपर्यंत झालेला अपुरा पाऊस या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी आज आढावा बैठक घेतली. पाणी टंचाईच्या उपाययोजनांच्या अनुषंगानं जलदगतीनं कार्यवाही करावी आणि तीव्र पाणीटंचाई असलेल्या भागावर लक्ष केंद्रित करून स्थानिक परिस्थितीनुसार जिल्हाधिकाऱ्यांनी टँकरबाबत निर्णय घ्यावे, असे निर्देश पाटील यांनी यावेळी दिले.

****

दहावा आंतरराष्ट्रीय योगदिन येत्या २१ जून रोजी साजरा होणार आहे. या निमित्त योगाभ्यासाचं महत्त्व सांगणारा संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमांवर दिला आहे. सर्वांनी योगाला आपल्या जगण्याचा अविभाज्य भाग करून घ्यावं आणि इतरांनाही तसं करण्यासाठी प्रोत्साहित करावं, असं आवाहन त्यांनी केलं आहे. विविध योगासनं आणि त्यांचे फायदे सांगणारी एक ध्वनिचित्रफीतही पंतप्रधान मोदी यांनी समाजमाध्यमांवर सामायिक केली आहे.

****

दिवंगत लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग सदाशिव साने अर्थात साने गुरुजी यांची आज पुण्यतिथी आहे. या दिवसाच्या औचित्यानं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एका ट्विट संदेशातून साने गुरुजींना अभिवादन केलं. पुणे महानगरपालिका कार्यालयात

महापालिका आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी साने गुरुजी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

****

आषाढी यात्रेसाठी श्री श्रेत्र पंढरपुरला जाणाऱ्या भाविक प्रवाशांसाठी एसटीने यात्राकाळात पाच हजार विशेष बस सोडण्याचं नियोजन केलं आहे. राज्यातील कोणत्याही गावातून ४० अथवा त्या पेक्षा जास्त भाविक प्रवाशांनी एकत्रित मागणी केल्यास त्यांना थेट पंढरपूरला जाण्यासाठी त्यांच्या गावातून एसटी बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी भाविक प्रवाशांनी आपल्या जवळच्या आगारात संपर्क साधावा असं आवाहन एसटी महामंडळातर्फे करण्यात आलं आहे.

****

मराठवाड्याच्या अनेक महसूल मंडळात काल अतिवृष्टीची नोंद झाली.

लातूर जिल्ह्यातल्या दहापैकी सहा तालुक्यात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. यात लातूर, औसा, निलंगा, चाकूर, रेणापूर आणि शिरूर अनंतपाळ या तालुक्यांचा समावेश आहे. काल एकाच दिवसात जिल्ह्यात ६३ पूर्णांक सात मिलीमीटर पाऊस झाला आहे. या दमदार पावसामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची तयारी सुरू केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

दरम्यान, जिल्ह्यात काल रात्री झालेल्या पावसामुळे रेणा नदीच्या पाणी पातळीत वाढ होऊन, रेणापूर, जवळगा आणि खरोळा बंधारे पूर्ण भरले आहेत. हवामान विभागानं मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे, त्यामुळे रेणा नदी काठावरच्या गावांमध्ये पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत रेणा नदी काठावरच्या गावातल्या शेतकरी आणि नदीकाठी वस्ती करून राहिलेल्या नागरिकांना लघु पाटबंधारे विभागाच्यावतीनं सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात गेल्या चोवीस तासात आठ महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. या पावसामुळे जिल्ह्यातल्या तेरणा नदीसह इतर नद्या वाहत्या झाल्या असून यामुळे धाराशीव जिल्ह्यावरचं पिण्याच्या पाण्याचं संकट काही प्रमाणात कमी होणार आहे. मृग नक्षत्राच्या पहिल्या काही दिवसातच पावसानं जोरदार हजेरी लावल्यानं लवकरच खरिपाच्या पेरण्यांना सुरुवात होणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे

****

बीड जिल्ह्यात काल चार महसुली मंडळात अतिवृष्टीची नोंद जिल्हा प्रशासनाकडे झाली आहे. यात घाटनांदूर मंडळामध्ये ६६ मिलीमीटर, अंबाजोगाई मंडळात ७१ मिलीमीटर, परळी वैद्यनाथ तालुक्यातील धर्मापुरी मंडळात ८१ मिलीमीटर, तर धारूर तालुक्याच्या मोहखेड मंडळात सर्वाधिक ९१ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे.

दरम्यान, नैऋत्य मोसमी पाऊस संपूर्ण मराठवाड्यात सक्रिय झाला आहे. आज, उद्या आणि परवा मराठवाड्यात अनेक ठिकाणी जोरदार वारे आणि विजांच्या कडकडाटासह मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

****

राज्य वस्तू आणि सेवा कर विभागानं केलेल्या जिल्ह्यांच्या विभागीय पुनर्रचनेमुळे धाराशिव जिल्ह्यातल्या व्यापारी आणि उद्योजकांची गैरसोय होणार असून, हा जिल्हा परत सोलापूर विभागीय कार्यालयाला जोडावा, अशी मागणी केली जात आहे. धाराशिव जिल्हा व्यापारी आणि कर सल्लागार संघटनेच्यावतीनं या मागणीचं निवेदन प्रभारी सहाय्यक राज्य कर आयुक्त नागनाथ शिंदे आणि राज्य कर अधिकारी दत्तात्रय निपाणीकर यांना आज देण्यात आलं.

****

दक्षिण कोरिया आणि मुंबईच्या काही निर्यात दारांनी आज जालना जिल्ह्यात बदनापूर मोसंबी केंद्रास भेट देऊन पाहणी केली. जालना जिल्ह्यात मोसंबीला भौगोलिक मानांकर मिळालेलं आहे. या फळांच्या विविध गुणधर्मासह, उत्पादन तंत्रज्ञान, फळं उपलब्धतेचा कालावधी याची शास्त्रीय माहिती कोरियाच्या शिष्टमंडळाने यावेळी जाणून घेतली.

****